महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार



छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २८९ वे दिनांक : १५/१०/२०२६ वार : गुरुवार

साखरेचा दर ५० रुपये किलो, इथेनॉलला ७० रुपये प्रतिलिटर द्या

कोल्हापूर : साखरेची किमान विक्री किंमत प्रतिकिलो ५० रुपये आणि सी-हेवी मोलॅसिसपासून तयार होणाऱ्या इथेनॉलचा दर प्रतिलिटर ७० रुपये करण्याच्या मागणीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष आणि माजी खासदार राजू शेट्टी ठाम आहेत. या दोन प्रमुख मागण्यांवर निर्णय झाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील कोगनोळी टोलनाक्यावर सुरू असलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनस्थळी कोल्हापूरच्या प्रादेशिक साखर सहसंचालक उज्ज्वला पळसकर यांनी भेट देऊन शेट्टी यांच्याशी चर्चा केली. मात्र, महाराष्ट्र सरकारला जाग येण्यास उशीर झाल्याची टीका करत शेट्टी यांनी मागण्यांबाबत ठोस निर्णय घेण्याची भूमिका मांडली. कोगनोळी टोलनाक्यावर सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर प्रादेशिक साखर सहसंचालक उज्ज्वला पळसकर यांनी राजू शेट्टी यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांची माहिती जाणून घेतली. शेट्टी यांनी साखरेची किमान विक्री किंमत आणि इथेनॉलच्या खरेदीदरात वाढ करण्याच्या मागण्या त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. या भेटीनंतर बोलताना शेट्टी यांनी राज्य सरकारच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली. या प्रश्नांबाबत ण यापूर्वीच राज्य आणि केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला आहे. मुख्यमंत्र्यांसह केंद्रीय कृषिमंत्री आणि पंतप्रधानांनाही पत्रव्यवहार केला असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे आता केवळ मागण्यांची माहिती घेण्यापेक्षा त्यावर प्रत्यक्ष निर्णय होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. साखर उद्योग आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी राजू शेट्टी यांनी केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला आहे. याच संदर्भात दिल्लीत केंद्रीय कृषिमंत्री आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांसोबत सुमारे चार तास बैठक झाल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, साखरेची किमान किंमत आणि इथेनॉलचा खरेदीदर या प्रश्नांवर अद्याप ठोस निर्णय झालेला नसल्याने आंदोलन सुरू ठेवण्याची भूमिका त्यांनी घेतली आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या २५ व्या ऊस परिषदेत ठरलेल्या मागण्यांची अंमलबजावणी व्हावी, यासाठी संघटना आक्रमक झाली आहे. साखरेच्या विक्रीदरात वाढ न झाल्यास साखर कारखान्यांच्या अर्थकारणावर आणि ऊस उत्पादकांना मिळणाऱ्या दरावर परिणाम होऊ शकतो, अशी आंदोलकांची भूमिका आहे. त्यामुळे केंद्र सरकारने या मागण्यांवर ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी शेट्टी यांनी केली आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेने साखर उद्योगाशी संबंधित प्रमुख मागण्यांसाठी आंदोलन सुरू केले आहे. साखरेची किमान विक्री किंमत प्रतिकिलो ५० रुपये करावी, तसेच सी-हेवी मोलॅसिसपासून तयार होणाऱ्या इथेनॉलला प्रतिलिटर ७० रुपये दर द्यावा, या मागण्यांवर संघटनेचा विशेष भर आहे. याशिवाय, लवकर गळीत हंगाम सुरू होत असल्याच्या पार्श्वभूमीवर ऊस उत्पादकांना प्रतिटन ५०० रुपये अनुदानासह प्रतिटन ५,००० रुपये दर मिळावा, अशीही संघटनेची मागणी आहे. या मागण्यांमुळे ऊस उत्पादकांना दिलासा मिळेल आणि साखर उद्योगातील आर्थिक प्रश्न सोडवण्यास मदत होईल, अशी संघटनेची भूमिका आहे. आंदोलन आणखी किती काळ सुरू राहणार, असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता राजू शेट्टी यांनी आंदोलन सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट केले. साखरेची किमान किंमत प्रतिकिलो ५० रुपये आणि इथेनॉलचा दर प्रतिलिटर ७० रुपये करण्याच्या मागण्यांवर निर्णय झाल्याशिवाय आंदोलनस्थळ सोडणार नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. दरम्यान, १४ नोव्हेंबर रोजी सुरू असलेल्या या आंदोलनामुळे केंद्र सरकार आणि साखर उद्योगासमोरील प्रश्न पुन्हा ऐरणीवर आले आहेत. शेतकऱ्यांच्या मागण्यांवर सरकार काय भूमिका घेते आणि आंदोलनावर तोडगा काढण्यासाठी पुढील पावले कोणती उचलली जातात, याकडे आता लक्ष लागले आहे.

समान नागरी कायद्याला विरोध केल्यास जीवे मारण्याची धमकी

सांगली : समान नागरी कायद्याच्या मुद्द्यावरून राष्ट्रवादी काँग्रेसचे विधानपरिषदेचे आमदार इद्रिस नायकवाडी यांना जीवे मारण्याची धमकी मिळाल्याची घटना समोर आली आहे. समान नागरी कायद्याला विरोध केल्यास तुम्हाला संपवून टाकू, अशा आशयाचे धमकीचे पत्र अज्ञात व्यक्तीने पाठवल्याचे नायकवाडी यांनी सांगितले. या प्रकरणी त्यांनी मिरज शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. धमकीचे पत्र पाठवणाऱ्या व्यक्तीचा शोध पोलिसांकडून सुरू असून, या घटनेमुळे सांगली जिल्ह्यात राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. विशेष म्हणजे, समान नागरी कायद्याच्या मुद्द्यावर पक्षाने आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी नायकवाडी यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांकडे केली होती. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना त्यांनी यासंदर्भात पत्रही पाठवले होते. त्यानंतर धमकीचे पत्र मिळाल्याचा दावा त्यांनी केला आहे. त्यामुळे या प्रकरणाला राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. राज्यात समान नागरी कायदा लागू करण्याच्या चर्चांना वेग आला असताना आमदार इद्रिस नायकवाडी यांनी या कायद्याला विरोध दर्शवला आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाला पत्र लिहून राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका स्पष्ट करण्याची मागणी केली होती. राष्ट्रवादी काँग्रेस हा धर्मनिरपेक्ष विचारांचा पक्ष असल्याचे नमूद करत, समान नागरी कायद्याच्या प्रश्नावर पक्षाने स्पष्ट भूमिका घ्यावी, असे त्यांनी पत्रातून सांगितले होते. राज्य विधिमंडळाच्या आगामी हिवाळी अधिवेशनात समान नागरी कायद्याशी संबंधित विधेयक मांडले जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशा परिस्थितीत पक्षाची भूमिका काय असेल, याबाबत स्पष्टता असणे आवश्यक असल्याचे नायकवाडी यांनी आपल्या पत्रात नमूद केले होते. सरकारच्या संभाव्य निर्णयाबाबत पक्षाने आपली भूमिका जाहीर करावी, अशी त्यांची मागणी होती. दरम्यान, या भूमिकेनंतरच धमकीचे पत्र मिळाल्याचे नायकवाडी यांनी सांगितल्याने या घटनेमागील नेमके कारण काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. मात्र, धमकी देणाऱ्या व्यक्तीची ओळख अद्याप स्पष्ट झालेली नाही. तसेच, धमकीच्या पत्राचा आणि नायकवाडी यांनी पक्षाकडे केलेल्या मागणीचा परस्पर संबंध आहे का, हे तपासातूनच स्पष्ट होणार आहे. धमकीचे पत्र मिळाल्यानंतर आमदार नायकवाडी यांनी मिरज शहर पोलिसांकडे धाव घेत तक्रार नोंदवली. या प्रकरणी पोलिसांनी अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली असून, पत्र पाठवणाऱ्या अज्ञात व्यक्तीचा शोध घेतला जात असल्याची माहिती पोलिसांनी दिली. लोकप्रतिनिधीला अशा प्रकारे धमकी मिळाल्याने या प्रकरणाची गंभीर दखल घेण्याची मागणी होत आहे. धमकीचे पत्र कोणी पाठवले, त्यामागे कोणाचा हेतू होता आणि संबंधित व्यक्तीने नेमक्या कोणत्या कारणातून ही धमकी दिली, याबाबत तपासातून माहिती समोर येण्याची शक्यता आहे. सध्या या प्रकरणातील संशयिताची ओळख आणि धमकीमागील कारण स्पष्ट झालेले नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते अजित पवार यांनी भाजपच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, या निर्णयानंतरही पक्षाची वैचारिक भूमिका आणि सर्वधर्मसमभावाची विचारधारा कायम असल्याचे ते विविध भाषणांतून सांगत होते. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची भूमिका त्यांनी मांडली होती. अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत घडामोडी आणि नेत्यांमधील मतभेदांबाबतही चर्चा झाली होती.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १५ ऑक्टोबर २०२६

जिंतूर च्या रामपुरकर पती-पत्नी यांचा सहभाग

जिंतूर (बी. डी. रामपूरकर) : तालुक्यातील जिंतूरपासून १३ किलोमीटर अंतरावर असलेल्या श्री क्षेत्र भोगाव देवी येथे नवरात्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज पहाटे ५ वाजता महाअभिषेक, त्यानंतर महाआरती, देवीपाठ आदी धार्मिक विधी पार पडत असून, परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.आजच्या महापूजेचा मान भोगाव देवी येथील रवी देशमुख सर, जिंतूर येथील आकाश रामपूरकर, सचिन चिद्रवार, अग्रवाल आदी यजमानांना मिळाला. त्यांच्या हस्ते विधिवत महापूजा करण्यात आली.मंदिर संस्थानचे अध्यक्ष तथा माजी आमदार गुलाबचंद राठी, उपाध्यक्ष भगवानराव देशमुख, सचिव प्रल्हादराव देशमुख, सहसचिव नामदेवराव शेवाळे, कोषाध्यक्ष प्रमोद पांडे तसेच विश्वस्त मंडळातील सुभाषचंद्र तिवारी व विठ्ठल देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली नवरात्रोत्सवाचे नियोजन करण्यात आले आहे.भाविकांसाठी अन्नछत्राची सुविधानवरात्रोत्सव काळात जगदंबा अन्नछत्र मंडळाच्या वतीने दररोज सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत भाविकांसाठी प्रसादाची व्यवस्था करण्यात येत आहे. श्री क्षेत्र भोगाव देवी येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी या प्रसाद सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

अबूजर शेख जलालची सलग दुसऱ्या वर्षी विभागीय स्पर्धेसाठी निवड

जळगाव : जिल्हास्तरीय शासकीय क्रीडा स्पर्धेत इकरा पब्लिक हायस्कूलच्या अबूजर शेख जलाल याने कॅरम स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड मिळवली आहे. विशेष म्हणजे, सलग दुसऱ्या वर्षी त्याने विभागीय स्तरावर खेळण्याचा मान मिळवून आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीची छाप पाडली आहे.जळगाव येथील कांताई हॉलमध्ये पार पडलेल्या जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेत अबूजरने १७ वर्षांखालील वयोगटात कौशल्यपूर्ण खेळाचे प्रदर्शन केले. अचूक निशाणा, एकाग्रता आणि उत्कृष्ट खेळाच्या जोरावर त्याने प्रतिस्पर्ध्यांना कडवी टक्कर देत आपले स्थान निश्चित केले.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. अब्दुल करीम सालार, जनरल सेक्रेटरी एजाज मलिक आणि मुख्याध्यापक शेख शकील यांनी अबूजरचे अभिनंदन करून आगामी विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. त्याला शाळेचे क्रीडाशिक्षक आमीर खान यांचे मार्गदर्शन लाभले.सलग दुसऱ्या वर्षी विभागीय स्तरावर निवड होणे हे अबूजरच्या मेहनतीचे, सातत्याचे आणि क्रीडा कौशल्याचे प्रतीक आहे.

तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात केहाळ तांडा शाळेची यशस्वी भरारी

जिंतूर (बि. डी. रामपूरकर) : तालुकास्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शनात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, केहाळ तांडा येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. 'स्वयंचलित पाणी यंत्र' (Automatic Water Machine) या वैज्ञानिक प्रयोगाने प्राथमिक गटातून प्रथम क्रमांक पटकावल्याने शाळेच्या शैक्षणिक यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील ५४ व्या राज्यस्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शनाच्या अनुषंगाने शिक्षण विभागाच्या वतीने तालुकास्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शनाचे आयोजन जिंतूर येथील जिजामाता विद्यालय या शाळेत ९ ऑक्टोबर २०२६ रोजी करण्यात आले होते. या प्रदर्शनात प्राथमिक गटातून 25, तर माध्यमिक गटातून 14 शाळांनी सहभाग नोंदविला होता.या प्रदर्शनात केहाळ तांडा शाळेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'स्वयंचलित पाणी यंत्र' या नाविन्यपूर्ण वैज्ञानिक प्रयोगाने परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले. या प्रयोगाची संकल्पना व प्रतिकृती साकारण्यासाठी शाळेतील इयत्ता सातवीतील विद्यार्थी कु .शीतल राहुल जाधव व चि. विराज तुळशीराम जाधव यांनी कठोर परिश्रम घेतले. त्यांच्या मेहनतीला यश मिळून या प्रयोगाने तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळविला.या यशासाठी विज्ञान शिक्षक श्री. निखील अन्नदाते, श्री. काशिनाथ वाकुडे,शाळेचे मुख्याध्यापक श्री. तुकाराम काळे तसेच येलदरी बीट चे जेष्ठ विस्तार अधिकारी तथा केहाळ केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. के.सी.घुगे सर यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले . विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला प्रोत्साहन, वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोपासना आणि प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण देण्याच्या प्रयत्नांना या यशामुळे बळ मिळाले आहे.या यशाबद्दल शाळेतील शिक्षकवृंद, पालक व ग्रामस्थांकडून विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करण्यात येत आहे. केहाळ तांडा शाळेच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण असून विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीसाठी प्रेरणा मिळाली आहे.

जयश्री वाकेकर यांच्या वाढदिवसानिमित्त भिक्खू संघाला फळदान

छत्रपती संभाजीनगर :आदर्श शिक्षिका जयश्री सुनील वाकेकर यांच्या वाढदिवसानिमित्त नागरी मूलभूत हक्क अभियानाच्या वतीने धम्मभूमी, बुद्धलेणी येथे भिक्खू संघाला फळदान करण्यात आले. यावेळी भदंत संघप्रिय थेरो, भदंत नागसेनबोधी थेरो, भन्ते बोधिधम्म आणि भन्ते निर्वाण यांनी त्रिशरण व पंचशील देऊन जयश्री वाकेकर यांना मंगल मैत्री व्यक्त केली. वाढदिवसाच्या निमित्ताने धम्मकार्याला जोड देत दानपारमितेचा बौद्ध संस्कार जपणारा हा उपक्रम राबविण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरातील धम्मभूमी, बुद्धलेणी येथे १० ते २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पूज्य भिक्खू विशुद्धानंद बोधी महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली दहा दिवसीय श्रामणेर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात १२ वर्षांवरील मुलांसह इच्छुकांना प्रव्रज्या देण्यात आली असून, सहभागी श्रामणेरांना त्रिशरण, पंचशील, परित्राणपाठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या २२ प्रतिज्ञा आणि ध्यानसाधना यांविषयी मार्गदर्शन व प्रशिक्षण दिले जात आहे. बुद्धांच्या विचारांचा प्रसार करणे, धम्माचे प्राथमिक ज्ञान रुजविणे आणि नैतिक मूल्यांची जोपासना करणारे सुजाण नागरिक घडविणे, हा या शिबिराचा प्रमुख उद्देश आहे. या धम्ममय वातावरणात भिक्खू संघाला फळदान करून जयश्री वाकेकर यांनी श्रद्धा, आदर आणि दानशीलतेच्या बौद्ध मूल्यांशी नाते जोडले. वाढदिवसानिमित्त धम्मदान व दानपारमितेच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. यावेळी उपासक प्रा. गुणरत्न सोनवणे, अक्रम खान, अमरदिप हिवराळे, प्रा. अविनाश सावंत, श्री लटंगे आदी उपस्थित होते. नागरी मूलभूत हक्क अभियानाच्या वतीने आयोजित या उपक्रमातून बौद्ध धम्मातील मंगल मैत्री, दानशीलता आणि सामाजिक सद्भावनेची मूल्ये अधोरेखित झाली.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १५ ऑक्टोबर २०२६

तूच माझी रंभा

गुलाबाच्या फुलापरी,
माझ्या मनात भरली
तुला पाहून पाहून,
अर्धी हयात सरली. १

तुझे सौंदर्य पाहून,
मीच मला विसरलो.
तुला पाहता पाहता,
अचानक घसरलो. २

नयनात तुझ्या जादू,
काठोकाठ भरलेले.
सखी तुझ्या गालावर,
हास्य किती फुललेले. ३

तूच माझी अप्सरा गं,
सखी तूच माझी रंभा.
दोघं मिळून सोबत,
करू आनंदाने झुंबा. ४

दोघं मिळून आपण,
आंबा आनंदात खाऊ.
आनंदात सोबतीने,
गीत संसाराचे गाऊ. ५

नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर

माणसं वाचतो आहे

पुढल्याच ठेच अन् मागचा शहाणा
हे असलं जरी खरं
तरी स्वतःस ढेच लागल्याशिवाय
येतं नसतं शहाणपण..

म्हणून आता पुस्तकांपेक्षा
माणसंच जास्त वाचतो आहे
पण विश्वास मात्र
पुस्तकांवर ठेवतो आहे..

कारण ते बदलत नसतात
वारं पाहून रंगबदलू
गोलमोल माणसासारखे..

ते दाखवत असतात
काळंकुट्ट रूप बगळ्याचं
पाण्यातल्या माशाला..
जरी दिसत असला तो
वरून पांढराशुभ्र..गोरापान..

पण कळतं कुठं माशाला
बगळ्याचं खरं रूप
मेल्याशिवाय...

म्हणून आता
जगण्याच्या तगमगीतून
अनुभवाच्या शाळेतली
बाराखडी शिकतो आहे..

वाटेतल्या टाळता येतील
तितक्या दगड धोंड्या सोबत
काट्याकुट्यांना टाळून
सावधपणे चालतो आहे..

ज्ञानेश्वर गायके,
कन्नड

फैजन शेखची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड; महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशात भर

जालना : आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय जालना येथील खेळाडूंनी महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. पाथ्रीकर महाविद्यालय, बदनापूर येथे आयोजित आंतरमहाविद्यालयीन बेस्ट फिजिक स्पर्धेत महाविद्यालयाच्या फैजन शेख याने ६० किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले, तर सलाउद्दीन शेख याने ७० किलो वजनी गटात कांस्यपदक मिळवून महाविद्यालयाच्या यशात मोलाची भर घातली. या स्पर्धेत फैजन शेख याने केलेली कामगिरी विशेष उल्लेखनीय ठरली आहे. त्याच्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर त्याची विशाखापट्टणम येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ बेस्ट फिजिक स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धेत तो आपल्या विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार असून, महाविद्यालयासाठी ही अभिमानाची बाब आहे. आता राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेतही फैजन आपली गुणवत्ता सिद्ध करेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.बेस्ट फिजिकसारख्या स्पर्धेत यश मिळवण्यासाठी नियमित व्यायाम, योग्य आहार, शिस्त, सातत्य आणि कठोर परिश्रम यांना विशेष महत्त्व असते. शरीरसौष्ठवाच्या क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी खेळाडूंना सातत्याने सराव करावा लागतो. फैजन शेख आणि सलाउद्दीन शेख यांनी मिळवलेले यश त्यांच्या मेहनतीचे, जिद्दीचे आणि क्रीडाक्षेत्रातील समर्पणाचे प्रतीक आहे. त्यांच्या या कामगिरीमुळे महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात सहभागी होऊन आपले कौशल्य विकसित करण्याची प्रेरणा मिळणार आहे. महाविद्यालयीन जीवनात शिक्षणासोबतच क्रीडाक्षेत्रालाही महत्त्वाचे स्थान आहे. खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास, चिकाटी, संघभावना आणि आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता विकसित होते. अशा स्पर्धांमधील यश विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देण्याबरोबरच महाविद्यालयाची क्रीडाक्षेत्रातील ओळख अधिक भक्कम करण्यास मदत करते. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे यांनी दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांचे कौतुक केले. फैजन शेख याची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाल्याने महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशाला नवी दिशा मिळाली आहे. आगामी स्पर्धेतही त्याने उत्कृष्ट कामगिरी करावी, अशा शुभेच्छा यावेळी व्यक्त करण्यात आल्या. या प्रसंगी क्रीडा विभागप्रमुख डॉ. भिकुलाल सले, डॉ. रवींद्र शिंपी, डॉ. निशिकांत लोखंडे, प्रा. अभिजीत भुतेकर, अभिषेक ढेंबरे आणि अनिल जाधव उपस्थित होते.

एका निष्पाप सहजीवाची मदत!

आज आमच्या अभिनव विद्या विहार प्राथमिक शाळेत मधल्या सुट्टीत मुले झाडाखाली थांबली होती. तेवढ्यात त्यांना एक खारीचे छोटेसे पिल्लू खाली पडलेले दिसले. ते पिल्लू घाबरलेले होते. त्याला तहानही लागली होती.मुलांनी लगेच नागठाणे सरांना याबद्दल सांगितले. सर तातडीने तेथे आले. त्यांनी त्या छोट्याशा खारीच्या पिल्लाला अलगद उचलून हातात घेतले आणि त्याला पाणी पाजले. हे सर्व पाहून मुलेही भावुक झाली. काही मुले तर, "सर, याला काहीतरी खायला द्या ना!" असे म्हणत होती. त्या चिमुकल्या पिल्लाला पाहून सर्वांनाच त्याच्याबद्दल माया वाटत होती.पण आता एक प्रश्न सर्वांच्या मनात निर्माण झाला होता, हे पिल्लू आले कोठून? याचे घर कुठे असेल? मग काय, मुलेही सरांसोबत त्याच्या घराचा शोध घेऊ लागली.शेवटी आम्हाला त्याचे घर सापडले! शाळेतील सौरऊर्जेच्या खांबावर असलेल्या बॅटरीच्या पेटीत थोडी रिकामी जागा होती. तेथे खारीची दोन पिल्ले आणि त्यांची आई राहत असावीत, असा आम्हाला अंदाज आला.आम्ही ती पेटी उघडून पाहिली असता, आत खारीचे आणखी एक पिल्लू दिसले. मग आम्ही खाली पडलेल्या पिल्लाला अलगदपणे त्याच्या घरात सोडले आणि पेटी बंद केली. त्या पेटीला खारीच्या येण्या-जाण्यासाठी एक छोटेसे छिद्र होते.मात्र, ती पेटी लोखंडी पत्र्याची असल्यामुळे उन्हात गरम होत होती. त्यामुळे आम्ही ओले बारदान तिच्यावर ठेवले. तसेच, खारीच्या पिल्लांसाठी पाणी आणि खाण्यासाठी थोडे अन्नही ठेवले.या छोट्याशा प्रसंगातून आम्हाला एक मोठा संदेश मिळाला. माणसांप्रमाणेच पशू-पक्ष्यांनाही तहान लागते, भूक लागते, भीती वाटते आणि त्यांनाही सुरक्षिततेची गरज असते. ते बोलून दाखवू शकत नसले, तरी त्यांच्या वेदना आपण समजून घेतल्या पाहिजेत.आज आमच्या विद्यार्थ्यांनी केवळ एका खारीच्या पिल्लाला पाहिले नाही, तर दया, करुणा, प्रेम आणि सहजीवांविषयीची जबाबदारी यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.खरे शिक्षण केवळ पुस्तकांमध्ये नसते, तर अशा छोट्या-छोट्या कृतींतूनही मिळते.चला, आपणही आपल्या सभोवतालच्या पशू-पक्ष्यांची काळजी घेऊया. तहानलेल्या जीवांसाठी पाणी ठेवूया आणि प्रत्येक सजीवाकडे माणुसकीच्या नजरेने पाहूया! सहजीवांवर प्रेम करूया, निसर्गाचे रक्षण करूया!

विठ्ठल अनमुलवाड अभिनव विद्या विहार प्राथमिक शाळा, कौशल्यानगर ता. पूर्णा जि. परभणी मो. 9096075630

१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १५ ऑक्टोबर २०२६

दुष्काळावर मात - पाण्याचा एकेक थेंब वाचवा

सध्याऑक्टोबर २०२६ मध्येच, आपल्या महाराष्ट्रावर ७५% पाणीटंचाईचे भयानक संकट आले आहे!अजून उन्हाळा यायचा बाकी आहे! जरा शांतपणे बोटांवर मोजा आणि कॅलेंडरचा हा हिशोब बघा: • १) ऑक्टोबर (पावसाळा संपतानाच कोरड!) • २) नोव्हेंबर (थंडीची सुरुवात, पण धरणात पाणी नाही) • ३) डिसेंबर (गुलाबी थंडी, पण चिंतेचे ढग) • ४) जानेवारी २०२७ (नवीन वर्षाची सुरुवात टंचाईने) • ५) फेब्रुवारी (विहिरींची पातळी खाली) • ६) मार्च (उन्हाचा चटका आणि पाण्याचा टंचाईचा झटका) • ७) एप्रिल (रखरखते उन्हाळे आणि टँकरची वाट) • ८) मे (पाण्याच्या एका-एका थेंबासाठी जीवन-मरणाचा संघर्ष!)सलग ८ महिने... म्हणजेच तब्बल २४० दिवस!विचार करा, हे पुढील आठ महिने आपण कसे काढणार आहोत? आठ महिने म्हणजे काही लहान सहान काळ नाही. आणि एक सर्वात मोठा भ्रम डोक्यातून काढून टाका—"दुष्काळ हा फक्त शेतकऱ्यांचा विषय आहे, आपला काय संबंध?" 💡 पाणी वाचवण्याचे फंडे (आजपासूनच मिशन मोडवर लागू करूयात!)१. 'अर्धा ग्लास' पाहुणचार फंडा:आपल्याकडे घरी पाहुणा आला की आपण आदरातिथ्य म्हणून तांब्या भरून किंवा मोठा फुल ग्लास पाणी देतो. पाहुणा त्यातले दोन घोट पितो आणि उरलेले पाऊण ग्लास पाणी सरळ बेसिनमध्ये ओतून दिले जाते. • फंडा: इथून पुढे घरी आलेल्या प्रत्येक व्यक्तीला सुरुवातीला अर्धाच ग्लास पाणी देऊयात. नम्रपणे सांगूया, "पाणी मौल्यवान आहे, तुम्हाला अजून हवे असेल तर नक्की सांगा." पाहुणाही खूश आणि उरलेले हजारो लिटर पाणी वाया जाण्यापासून वाचेल!२. 'एक बादली' चॅलेंज (शॉवर ला कायमची गोळी मारूया!):शॉवरखाली उभे राहून मस्त गाणी गात आंघोळ करताना किती शेकडो लिटर पाणी वाहून जाते, याचा आपल्याला अंदाजच येत नाही. • फंडा: पुढील आठ महिने शॉवर पूर्णपणे बंद! फक्त एक बादली आणि एक तांब्या. एका माणसाच्या आंघोळीमागे रोज किमान ३० ते ४० लिटर पाणी वाचते. घरात ४ माणसे असतील तर रोज १५० लिटर पाण्याचे नेट सेव्हिंग!३. RO च्या पाण्याचा 'रिव्हर्स' मास्टरस्ट्रोक:आपल्या घरातील वॉटर प्युरिफायर (RO) १ लिटर पिण्याचे पाणी शुद्ध करण्यासाठी तब्बल ३ लिटर वेस्ट पाणी बाहेर टाकून देतो. आपण ते पाणी पाईपद्वारे थेट बेसिनमध्ये सोडून देतो. • फंडा: तो वेस्ट पाण्याचा पाईप एका मोठ्या कॅनमध्ये किंवा बादलीत सोडूया. ते पाणी अजिबात घाण नसते! ते पाणी फरशी (पोछा) पुसण्यासाठी, भांडी घासण्यासाठी, कपडे धुण्यासाठी किंवा संडासच्या फ्लशसाठी वापरता येईल..काय बरोबर ना!४. 'बेसिन लिकेज' आणि शेव्हिंग-ब्रश कट:सकाळी ब्रश करताना किंवा दाढी करताना नळ धोधो चालू ठेवण्याची अनेकांना सवय असते. • फंडा: शेव्हिंग करताना एका मगमध्ये पाणी घ्या. ब्रश करताना दात घासेपर्यंत नळ पूर्ण बंद ठेवा, फक्त तोंड धुण्याच्या वेळीच नळ चालू करा. या एका छोट्या सवयीने कुटुंबाचे रोज ५० लिटर पाणी वाचवण्याचा प्रयत्न करूया. ५. 'गाडी धुणे बंद, फक्त ड्राय क्लिनिंग चालू!':सकाळी उठून पाईप लावून धोधो पाण्याने गाडी धुणे म्हणजे सध्याच्या परिस्थितीत पाण्याचा खून करण्यासारखे आहे. • फंडा: गाडी/आपली वाहने धुण्यासाठी पाईप वापरणे पूर्ण बंद करूया! आठवड्यातून एकदा किंवा दोनदा एका लहान बादलीत पाणी घेऊन ओल्या फडक्याने आपली वाहने पुसून घेऊया. आपली वाहने थोडी कमी चमकली तरी चालेल भाऊ, पण निसर्गाचे आणि आपले भविष्य नक्कीच चमकून निघेल.६. 'भाजी-तांदूळ' वॉटर बँक:घरात आई, बायको किंवा बहीण भाजी धुते, तांदूळ-डाळ धुते, ते पाणी आपण थेट बेसिनच्या गटारात सोडून देतो. • फंडा: स्वयंपाकघरात भाजी आणि धान्य धुतलेले पाणी एका वेगळ्या घमेल्यात साठवून ते पोषक पाणी गच्चीवरील किंवा गॅलरीतील कुंडीतल्या झाडांना घालूया. झाडांना नैसर्गिक खत-पाणी मिळेल आणि आपले नळाचे अनमोल पाणी वाचेल!७. 'थेंब-थेंब' लिकेजवर सर्जिकल स्ट्राइक:आपल्या घरातील किंवा इमारतीतील नळातून जर 'टिप-टिप' पाणी गळत असेल, तर आपण "अरे जाऊ दे, थेंबच तर गळतोय" म्हणून दुर्लक्ष करतो. • फंडा: तो एक-एक थेंब २४ तासांत अख्खी २० लिटरची बादली भरतो! आजच प्लंबरला बोलावून आणि घरातील सर्व गळती बंद करूया. प्लंबर मिळेपर्यंत त्या नळाखाली एखादे भांडे ठेऊन, ते साठलेले पाणी वापरात आणूया. ८. फ्लश टँकमध्ये 'एक लिटरची बाटली' फंडा:आपण एकदा फ्लश केला की टँकमधून थेट ८ ते १० लिटर पाणी वाहून जाते. • फंडा: प्लास्टिकच्या १ लिटरच्या बाटलीत पाणी किंवा वाळू भरा, तिचे झाकण कडक लावा आणि ती बाटली तुमच्या फ्लश टँकच्या आत ठेवून द्या. यामुळे प्रत्येक वेळी फ्लश करताना १ लिटर पाणी कमी वापरात येईल आणि टँकचे कामही होईल!मित्रांनो, निसर्गाने आपल्याला यंदा वेळेच्या आधीच कडक इशारा दिला आहे. अजूनही आपल्याकडे वेळ आहे. हे उरलेले पावसाचे दिवस आणि येणारे आठ महिने जर आपण संयमाने आणि युक्तीने पाणी वापरले, तरच आपण या संकटातून सहीसलामत बाहेर पडू शकू.शेवटचा कडक मंत्र:"आज जर पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरला नाही, तर उद्या पश्चात्तापाचे अश्रू ढाळायलाही डोळ्यात पाणी उरणार नाही!"पाणी वाचवा..!

प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे,
जे ई एस महाविद्यालय
जालना,
भ्रमणध्वनी
४२१३१९२७०

बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात सायन्स फोरमचे उद्घाटन

जालना : बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या सायन्स फोरमचे उद्घाटन संपन्न झाले. यावेळी प्र.प्राचार्य डॉ. भूषण नाफडे यांच्यासह यावेळी विज्ञान मंच समितीचे प्रभारी डॉ. सुरेश कांगणे, विज्ञान मंचच्या विद्यार्थी प्रतिनिधी नम्रता ठाकूर, सचिव यशराज बायस, डॉ. निशिकांत लोखंडे, डॉ. निलेश बर्डे, डॉ. रवींद्र शिंपी, डॉ. पवन देशमुख, कांचन कायंदे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविकात तन्मयी शिंदे हिने विज्ञान मंचाच्या स्थापनेमागील उद्देश स्पष्ट करताना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासात विज्ञानविषयक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. विज्ञान मंचाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, प्रयोगशीलतेला चालना देणे आणि संशोधनाची आवड निर्माण करणे यावर भर देण्यात येणार आहे. विज्ञानविषयक व्याख्याने, चर्चासत्रे, प्रकल्प सादरीकरणे, विज्ञान प्रदर्शने आणि विविध स्पर्धांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पकतेला वाव देणारे व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाणार आहे. तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील नवनवीन संधींची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचाही प्रयत्न केला जाणार आहे. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता वैज्ञानिक प्रयोग, संशोधन आणि नवकल्पनांच्या माध्यमातून ज्ञानाची कक्षा रुंदावावी, या दृष्टीने विज्ञान मंच महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. विज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, चिकित्सक विचार आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित होण्यास मदत होणार आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सुरेश खरात, जनार्दन कळम, सुंदर वायाळ, रोहन वर्तले यांनी विशेष सहकार्य केले. सूत्रसंचालन तन्मयी शिंदे हिने केले तर आभार विज्ञान मंचाचे सचिव यशराज बायस यांनी मानले.

शिवाजी महाविद्यालय कन्नड येथे विद्यार्थ्यांना उत्कृष्ट वाचक पुरस्कार जाहीर

कन्नड : येथील शिवाजी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिनानिमित्त (दि. १५ ऑक्टोबर) मराठी विभाग, ग्रंथालय विभाग आणि तिफण वाचक चळवळ यांच्या संयुक्त विद्यमाने सातत्याने पुस्तक वाचन करून विविध उपक्रमात सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सन २०२६-२७ या वर्षातील उत्कृष्ट वाचक पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.विद्यार्थी लेखन-वाचनाकडे वळावेत, त्यांच्यावर वाङ्मयीन संस्कार व्हावेत तसेच इतर विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने हे पुरस्कार सुरू करण्यात आले आहेत, अशी माहिती प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी दिली.पुरस्कार प्राप्त विद्यार्थी पुढीलप्रमाणे -१) कु. पूजा चव्हाण-बी.ए. द्वितीय वर्ष२) कु. साक्षी धनेधर - बी.ए. द्वितीय वर्ष३) कु. साक्षी सोळुंके - बी.फार्मसी चतुर्थ वर्ष४) कु. जान्हवी गाढे-बी.सी.एस. तृतीय वर्ष५) संकेत निकम - बी.फार्मसी द्वितीय वर्षया कार्यक्रमास डॉ. भिमराव कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. ए. के. महाले हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून त्यांचा उत्कृष्ट वाचक म्हणून विशेष सन्मान करण्यात येणार आहे. तसेच प्रख्यात कवयित्री डॉ. प्रतिभा अहिरे यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभणार आहेत. उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर यांची उपस्थिती लाभणार आहे. ग्रंथालयात दुर्मिळ ग्रंथाचे प्रदर्शन आयोजित केले असून वाचन प्रेरणा दिना निमित्त विद्यार्थ्यांचे काव्यवाचन होणार आहे. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजय भोसले राहाणार आहेत.हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या सभागृहात सकाळी ११.०० वाजता होणार असून कार्यक्रमाचे संयोजन मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे , डॉ. रामचंद्र झाडे, ग्रंथपाल संतोष देशमुख यांनी केले आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १५ ऑक्टोबर २०२६

पर्यावरण संरक्षणासाठी शिक्षकांची ३६० किमी सायकल स्वारी!

जिंतूर (बी. डी. रामपूरकर) : माहूरसह परतीचा प्रवास पूर्ण; पर्यावरण जनजागृतीचा संदेशजिंतूर : पर्यावरणाचा वाढता ऱ्हास आणि प्रदूषणाच्या समस्येच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनासाठी जनजागृती करणे काळाची गरज बनली आहे. याच सामाजिक जाणिवेतून जिंतूर येथील शिक्षक गजानन पतरवाळे, गजानन साबळे आणि परमेश्वर मेनकुदळे यांनी तब्बल ३६० किलोमीटरचा सायकल प्रवास अवघ्या २२ तासांत पूर्ण केला. त्यांच्या या उपक्रमातून पर्यावरण संरक्षणाचा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला.जिंतूर-औंढा नागनाथ- हिंगोली-पुसद-माहूर आणि परतीच्या प्रवासात उमरखेड -हदगाव-वारंगा-कुरुंदा-शिरड-जिंतूर असा प्रवास या तिघांनी सायकलवरून पूर्ण केला. इंधनाचा वापर कमी करणे, प्रदूषणावर नियंत्रण मिळवणे आणि पर्यावरणाविषयी जनजागृती करणे, या दृष्टीने सायकलचा वापर महत्त्वाचा ठरतो. या उपक्रमातून त्यांनी आरोग्य आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.३६० किलोमीटरची सायकल स्वारी यशस्वीरीत्या पूर्ण करून जिंतूर येथे परतल्यानंतर त्यांचे मित्र गजानन गबाळे, व्हाईस ऑफ मीडियाचे ता.अध्यक्ष सचिन रायपत्रीवार, भारत साखरे, ज्ञानेश्वर हाके, हरिभाऊ ठोंबरे, अनिल कवठेकर, सोपान खताळ, सोमेश पाटील, किशोर तळेकर, शेखर तडकसे, आकाश रामपूरकर आदींनी स्वागत करून अभिनंदन केले.पर्यावरण रक्षणासाठी केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष कृतीतून जनजागृती करता येते, हे या शिक्षकांनी आपल्या सायकल प्रवासातून दाखवून दिले. त्यांच्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

आयुष्यभर धन धन करीत निर्धन होणाऱ्या जीवनाचे रूप म्हणजे पसायधन होय

उदगीर (प्रतिनिधी) : आपल्या आयुष्यात वर्षाची भर पडत असताना जगणं मात्र वजा होत चाललय. आपलं राहणीमान जरासं उंचावले पण आत्म्याचे आक्रंदन ऐकण्यासाठी आपल्याला साधी उसंत सुद्धा मिळत नाही. त्यामुळे आपलं जगणं दळभद्री होत चाललंय. हे दळभद्रीपण कुणाच्या नजरेला पडू नये म्हणून केला जाणाऱ्या देखाव्यालाच आपण जीवन समजतोय. आयुष्यभर धन धन करीत निर्धन होणाऱ्या जीवनाचे रूप म्हणजे पसायधन हि साहित्यकृती होय. असे मत प्रा. बाबाराव विश्वकर्मा यांनी व्यक्त केले. चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गत गेल्या सोळा वर्षापासून सातत्याने चालू असलेल्या वाचक संवादाचे 370 वे पुष्प सूर्यकांत पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यावेळी प्रसिद्ध वक्ते प्रा.बाबाराव विश्वकर्मा , नांदेड यांनी डॉ. विश्वाधार देशमुख लिखित पसायधन या साहित्यकृतीवर अत्यंत प्रभावीपणे व संवेदनशीलपणे संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले की जगण्याची दिशाच माहीत नसल्याने अक्षरशा जीवनाची दशा होत आहे. जवळच्याच माणसांनी दिलेल्या जखमांनी विव्हळत असताना काही दोस्तांनी त्या जखमावर हळूच फुंकर घालावी, ती फुंकर म्हणजेच गुप्तधनासारखी असलेली पसायधन ही साहित्यकृती होय. यानंतर उपस्थितांपैकी मोहन निडवंचे, प्राचार्य नामदेव खंडगावे, गुंडप्पा पटणे, योग गुरू शिवमुर्ती भातांबरे यांच्यासह अनेकांनी चर्चेत सहभाग नोंदवला. त्यानंतर उपस्थिताना जन्मदिनाची ग्रंथ भेट देण्यात आली. शेवटी अध्यक्षीय समारोपात पांचाळ सूर्यकांत म्हणाले की दोस्ता दोस्तात मनस्वी मैत्री जुळावे म्हणून जगण्याला बळ देणारे हे पसायधन सर्वांनी वाटून घ्यावे. ज्यामुळे संवेदना जाग्या होऊन वेदना मुक्तीची वाट सापडेल असा संदेश लेखकांनी या साहित्यकृतीच्या माध्यमातून दिलेला आहे. गोविंदराव सावरगावे यांनी उत्कृष्ट सूत्रसंचालन केले तर कार्यक्रमाचे आभार प्रा. संजय गिरी यांनी मांडले. या कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी प्रा. राजपाल पाटील, हनुमंत म्हेत्रे, आनंद बिरादार, तुकाराम बिरादार, शिवशंकर पाटील, तुळशीदास बिरादार, संयोजक अनंत कदम, सुरेश शिंदे बेंबरेकर, मुरलीधर जाधव व सुरेश वजनम यांच्यासह अनेकानी परिश्रम घेतले.

भावनाताई बोर्डीकर यांच्या हस्ते तुळजाभवानी शुगरच्या गळीत हंगामाचा शुभारंभ

जिंतूर (बी. डी. रामपूरकर) : आज श्री तुळजाभवानी शुगर फॅक्टरी चा गळीत हंगाम व मोळीपूजन चेअरमन भावनाताई बोर्डीकर यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी सौ.मिनाताई बोर्डीकर ,सचिन मुंगसे पाटिल,.सचिन गोरे यांची विशेष उपस्थिती लाभली.या शुभप्रसंगी व्हाईस प्रेसिडेन्ट विवेक भारद्वाज सर.जनरल मॅनेजर विजय मते सर. वर्क्स मॅनेजर टोकलवाड सर.चिफ केमिस्ट कटियार सर. मुख्य शेतकी अधिकारी पाटील सर.ऊस उत्पादक शेतकरी बांधव,तोडणी व वाहतूक कंत्राटदार,कारखान्याचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.सहकार क्षेत्र हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून, साखर कारखाना हा शेतकरी, कामगार आणि परिसराच्या आर्थिक प्रगतीचा महत्त्वाचा आधार आहे. यंदाचा गळीत हंगाम यशस्वी होऊन ऊस उत्पादक शेतकरी बांधवांना लाभ मिळावा, कामगारांच्या कष्टांना योग्य सन्मान मिळावा आणि कारखान्याची प्रगती अधिक वेगाने व्हावी, हीच सदिच्छा.आधुनिकीकरणानंतरचा हा गळीत हंगाम यशस्वी करण्यासाठी शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त ऊस कारखान्याकडे पाठवावा असे आवाहन याप्रसंगी केले. चालू गळीत हंगामात ६ लाख मेट्रिक टन गाळप उद्दिष्ट ठेवले असून सक्षम तोडणी आणि वाहतूक यंत्रणा, अद्ययावत मशिनरीच्या जोरावर हे उद्दिष्ट पूर्ण होईल असा विश्वास यावेळी व्यक्त केला.सर्व ऊस उत्पादक शेतकरी बांधवांना, तोडणी-वाहतूक कंत्राटदारांना आणि कारखान्यातील अधिकारी-कर्मचारी यांना यशस्वी गळीत हंगामासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

जिंतूरमध्ये 'चालता बोलता' प्रश्नमंजुषेला उत्स्फूर्त प्रतिसाद

जिंतूर (बि. डी. रामपूरकर) : सामान्य ज्ञान, अध्यात्म, विज्ञान आणि व्यवहारज्ञानावर आधारित प्रश्न; विजेत्या मुली व महिलांचा बक्षिसे देऊन गौरवजिंतूर : दुर्गेश्वरी युवती मंडळ, जिंतूर यांच्या वतीने नवरात्र महोत्सवानिमित्त मुली व महिलांसाठी आयोजित विविध स्पर्धांअंतर्गत 'चालता बोलता' प्रश्नमंजुषा स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेला मुली व महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या स्पर्धेत सामान्य ज्ञान, अध्यात्म, विज्ञान तसेच दैनंदिन जीवनातील व्यवहारिक ज्ञानावर आधारित विविध प्रश्न विचारण्यात आले. मनोरंजक पद्धतीने आयोजित करण्यात आलेल्या या प्रश्नमंजुषेमुळे स्पर्धकांच्या ज्ञानाची चाचणी घेण्याबरोबरच त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासही मदत झाली. सलग पाच प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या अश्विनी कटारे, कांचन काळे, शकुंतला काळे, नेहा काळे, रूपाली सोळंके, मंदा डुबे आणि अश्विनी सुकाळे या महिलांसह विद्या कटारे, विभा बाभनकर, आराध्या डूबे आणि श्रावणी रोकडे या मुलींना विशेष बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून संध्या सचिन रायपत्रीवार आणि शामबाला वावरे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश डूबे यांनी केले.सामान्य ज्ञानासोबतच अध्यात्म, विज्ञान आणि व्यवहारज्ञानाची सांगड घालणाऱ्या या उपक्रमातून मुली व महिलांना ज्ञानाची देवाणघेवाण करण्याची आणि आत्मविश्वासाने उत्तरे देण्याची संधी मिळाली. दुर्गेश्वरी युवती मंडळाच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.नवरात्र महोत्सवानिमित्त मंडळाच्या वतीने आयोजित विविध स्पर्धांमधून मुली व महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासोबतच त्यांच्यातील आत्मविश्वास आणि बौद्धिक क्षमता वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १५ ऑक्टोबर २०२६

वाचनसंस्कृतीतून घडेल ज्ञानसमृद्ध आणि विवेकशील समाज - डॉ. राजेंद्र बगाटे

१५ ऑक्टोबर हा दिवस भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि तरुणांचे प्रेरणास्थान डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस म्हणजे केवळ पुस्तकांचे महत्त्व सांगण्याचा किंवा वाचनाची औपचारिक शपथ घेण्याचा दिवस नसून ज्ञानाशी मैत्री करण्याचा, विचारांना नवी दिशा देण्याचा आणि समाजात विवेकशीलतेची जाणीव निर्माण करण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. डॉ. कलाम यांनी आपल्या जीवनप्रवासातून जिज्ञासा, ज्ञान, परिश्रम आणि स्वप्नांच्या सामर्थ्याची ओळख करून दिली. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून त्यांनी विज्ञानाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आणि देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदापर्यंत मजल मारली. त्यांच्या जीवनातून शिक्षण आणि ज्ञान यांचे परिवर्तनकारी सामर्थ्य स्पष्ट होते. वाचन हे ज्ञानप्राप्तीचे प्रभावी साधन असून ते व्यक्तीच्या विचारविश्वाला समृद्ध करते, आत्मविश्वास वाढवते आणि जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता विकसित करते. म्हणूनच वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधताना वाचनाचे वैयक्तिक, शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व समजून घेणे आवश्यक आहे.मानवी संस्कृतीच्या विकासात वाचनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मानवाने आपल्या अनुभवांचे, निरीक्षणांचे, ज्ञानाचे आणि विचारांचे जतन करण्यासाठी लेखनकला विकसित केली. त्यातून एका पिढीने मिळविलेले ज्ञान पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे शक्य झाले. मौखिक परंपरेतून जतन झालेले ज्ञान आणि लिखित स्वरूपातील साहित्य यांच्या परस्परसंवादातून मानवी संस्कृतीचा प्रवास अधिक समृद्ध झाला. आज आपण प्राचीन समाजव्यवस्थांचा अभ्यास करू शकतो, ऐतिहासिक घटनांचा अर्थ लावू शकतो, विविध संस्कृतींची ओळख करून घेऊ शकतो आणि अनेक शतकांपूर्वीच्या विचारवंतांशी वैचारिक संवाद साधू शकतो, यामागे वाचन आणि लेखनाची परंपरा आहे. पुस्तकांमुळे काळ आणि अवकाश यांच्या मर्यादा ओलांडून ज्ञानाची देवाणघेवाण शक्य होते. एखाद्या व्यक्तीला आपल्या प्रत्यक्ष अनुभवांच्या पलीकडील असंख्य घटना, व्यक्ती आणि विचार समजून घेण्याची संधी वाचनातून मिळते. त्यामुळे वाचन हे केवळ वैयक्तिक छंदाचे साधन नसून मानवी ज्ञानपरंपरा जतन करणारे आणि तिचा विस्तार करणारे महत्त्वाचे माध्यम आहे.वाचन म्हणजे केवळ अक्षरे ओळखणे, शब्दांचे उच्चारण करणे किंवा पुस्तकातील मजकूर पूर्ण करणे नव्हे. वाचन ही आकलन, चिंतन, विश्लेषण आणि आत्मपरीक्षण यांची एकत्रित प्रक्रिया आहे. एखादे पुस्तक वाचताना वाचक लेखकाच्या विचारांशी संवाद साधतो. लेखकाने मांडलेले अनुभव, तर्क, निरीक्षणे आणि निष्कर्ष समजून घेण्याचा प्रयत्न करतो. काही विचार त्याला पटतात, तर काही विचारांबद्दल प्रश्न निर्माण होतात. काही वेळा पुस्तकातील एखादा विचार आपल्या पूर्वीच्या समजुतींना आव्हान देतो आणि नव्याने विचार करण्यास प्रवृत्त करतो. या प्रक्रियेमुळे चिकित्सक बुद्धी विकसित होते. प्रत्येक गोष्ट परंपरेने सांगितली आहे म्हणून स्वीकारण्याऐवजी तिची सत्यता, उपयुक्तता आणि सामाजिक परिणाम तपासण्याची वृत्ती निर्माण होते. वाचनामुळे माणूस एखाद्या प्रश्नाकडे एकाच दृष्टिकोनातून न पाहता त्याचे विविध पैलू समजून घेण्याचा प्रयत्न करतो. माहितीच्या प्रचंड प्रवाहात सत्य आणि असत्य, तथ्य आणि मत, तर्क आणि अफवा यांतील फरक ओळखण्यासाठी आज अशा चिकित्सक वाचनाची विशेष गरज आहे.वाचनाची गोडी बालपणापासून निर्माण झाली, तर तिचे सकारात्मक परिणाम आयुष्यभर अनुभवता येतात. बालवयात गोष्टी, कविता, चित्रपुस्तके आणि बोधकथांच्या माध्यमातून मुलांना भाषेची ओळख होते. त्यांच्या शब्दसंग्रहात भर पडते, कल्पनाशक्ती विकसित होते आणि स्वतःचे विचार व्यक्त करण्याची क्षमता वाढते. कथांमधील विविध पात्रे, त्यांचे संघर्ष आणि त्यातून निर्माण होणारे अनुभव मुलांना मानवी स्वभाव समजून घेण्यास मदत करतात. मैत्री, सहकार्य, प्रामाणिकपणा, धैर्य, समता आणि करुणा यांसारख्या मूल्यांची ओळख साहित्याच्या माध्यमातून होऊ शकते. मुलांना प्रश्न विचारण्याची मुभा दिली आणि वाचलेल्या गोष्टींबद्दल चर्चा केली, तर त्यांची जिज्ञासा अधिक बळकट होते. मात्र, वाचनाची सवय लावताना केवळ अभ्यासक्रमातील पुस्तकांवर भर देणे पुरेसे नाही. वयोगटानुसार विज्ञानकथा, निसर्गविषयक साहित्य, चरित्रे, प्रवासवर्णने आणि मनोरंजक कथा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. वाचनाला सक्तीचे काम न बनवता आनंददायी अनुभव बनविणे ही पालक आणि शिक्षकांची महत्त्वाची जबाबदारी आहे.कुटुंब हे वाचनसंस्कृतीचे पहिले केंद्र आहे. घरातील मोठी माणसे नियमितपणे पुस्तके, वर्तमानपत्रे आणि नियतकालिके वाचत असतील, तर मुलांनाही वाचनाची प्रेरणा मिळते. घरात मोठा ग्रंथसंग्रह असणे प्रत्येकाला शक्य नसले, तरी काही आवडीची पुस्तके उपलब्ध करून देणे, वाढदिवसाला पुस्तक भेट देणे, वाचलेल्या गोष्टींवर चर्चा करणे आणि दररोज काही वेळ वाचनासाठी राखून ठेवणे शक्य आहे. पालकांनी मुलांच्या हातातील भ्रमणध्वनी काढून घेण्यापुरते मर्यादित न राहता त्यांना पर्यायी आनंददायी कृती उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. पुस्तकांतील कथा, चित्रे आणि माहिती यांचा परिचय करून दिल्यास मुलांना पडद्यावरील मनोरंजनाबरोबरच वाचनातून मिळणाऱ्या आनंदाचीही जाणीव होते. मुलांनी कोणते साहित्य वाचावे याबाबत मार्गदर्शन आवश्यक असले, तरी त्यांच्या आवडीचा आदर करणेही महत्त्वाचे आहे. वाचनाची सवय एका दिवसात निर्माण होत नाही; ती सातत्यपूर्ण प्रोत्साहन, उपलब्ध साधने आणि घरातील अनुकूल वातावरण यांतून विकसित होते.शिक्षणव्यवस्थेत वाचनाला मध्यवर्ती स्थान देणे ही काळाची गरज आहे. शाळा आणि महाविद्यालये ही केवळ परीक्षा घेणारी किंवा पदवी प्रदान करणारी केंद्रे नसून स्वतंत्रपणे विचार करणाऱ्या व्यक्ती घडविणारी ज्ञानकेंद्रे असली पाहिजेत. पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांना विषयाचे मूलभूत ज्ञान देतात; परंतु अवांतर वाचनामुळे त्या ज्ञानाचा विस्तार होतो. इतिहासाच्या विद्यार्थ्याने विविध इतिहासकारांची मते, चरित्रे आणि ऐतिहासिक साधने वाचली, तर घटनांचे अनेक पैलू समजू शकतात. विज्ञानाच्या विद्यार्थ्याने वैज्ञानिकांचे जीवनकार्य आणि संशोधनविषयक साहित्य वाचले, तर त्याच्यात शोधक वृत्ती विकसित होऊ शकते. समाजशास्त्राच्या विद्यार्थ्याला जात, वर्ग, लिंग, ग्रामीण जीवन, नागरीकरण, सामाजिक विषमता आणि सामाजिक परिवर्तन यांचे आकलन विविध ग्रंथांमधून होते. साहित्याच्या वाचनामुळे मानवी भावविश्व आणि सामाजिक वास्तव समजण्यास मदत होते. त्यामुळे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केवळ पाठांतरावर आधारित न ठेवता आकलन, विश्लेषण, प्रश्ननिर्मिती, चर्चा आणि स्वतंत्र लेखन यांनाही महत्त्व दिले पाहिजे.उच्च शिक्षण आणि संशोधनाच्या क्षेत्रात वाचनाचे महत्त्व अधिक व्यापक आहे. संशोधन म्हणजे उपलब्ध माहितीचे संकलन करणे एवढेच नसून पूर्वीच्या संशोधनाचा चिकित्सक अभ्यास करून नवे प्रश्न उपस्थित करणे आणि पुराव्यांच्या आधारे निष्कर्ष मांडणे होय. यासाठी संदर्भग्रंथ, संशोधनपर लेख, नियतकालिके आणि विश्वासार्ह अहवाल यांचे नियमित वाचन आवश्यक असते. विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षेच्या काळात अभ्यास करण्याऐवजी आपल्या विषयातील मूलभूत ग्रंथ आणि समकालीन संशोधनाचा अभ्यास केला पाहिजे. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना वाचनसूची देण्याबरोबरच पुस्तक परीक्षण, चर्चासत्रे, सादरीकरणे आणि वाचनाधारित लेखन यांसारख्या उपक्रमांना प्रोत्साहन द्यावे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वतंत्र विचार करण्याची क्षमता विकसित होते. संशोधनातील संदर्भांची अचूकता, माहितीची पडताळणी आणि इतरांच्या विचारांचा प्रामाणिक उल्लेख करण्याची सवयही वाचनातून बळकट होते. ज्ञाननिर्मितीची प्रक्रिया समजून घेण्यासाठी आणि संशोधनाचा दर्जा उंचावण्यासाठी वाचन ही मूलभूत गरज आहे.भारतीय समाजातील सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात वाचन आणि लेखनाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. महात्मा ज्योतिराव फुले यांनी आपल्या लेखनातून जातिभेद, सामाजिक विषमता, स्त्रीशिक्षण आणि शोषणाच्या प्रश्नांवर कठोर भाष्य केले. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाच्या माध्यमातून ज्ञानप्राप्तीचे दरवाजे अधिक व्यापक समाजघटकांसाठी खुले करण्याचा प्रयत्न केला. राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्यातून शिक्षणातील समान संधी आणि सामाजिक न्याय यांचे महत्त्व अधोरेखित झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखनाने समता, स्वातंत्र्य, बंधुता, घटनात्मक मूल्ये आणि सामाजिक न्याय यांविषयी व्यापक वैचारिक जागृती घडवून आणली. या विचारवंतांचे योगदान समजून घेण्यासाठी त्यांचे लेखन वाचणे आवश्यक आहे. केवळ त्यांच्या प्रतिमांना अभिवादन करून किंवा जयंती साजरी करून सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया पूर्ण होत नाही. त्यांच्या विचारांचा अभ्यास करून वर्तमानातील प्रश्नांशी त्यांचा संबंध जोडणे गरजेचे आहे. वाचनामुळे अन्यायाची जाणीव निर्माण होते, वंचितांच्या अनुभवांविषयी संवेदनशीलता वाढते आणि समाजातील विषमता दूर करण्यासाठी वैचारिक आधार मिळतो.वाचनाचा संबंध व्यक्तीच्या भावनिक आणि मानसिक समृद्धीशीही आहे. कथा, कादंबऱ्या, कविता, आत्मचरित्रे आणि अनुभवकथनांमधून वाचकाला विविध मानवी अनुभवांची ओळख होते. आपल्यापेक्षा वेगळ्या सामाजिक, आर्थिक किंवा सांस्कृतिक परिस्थितीत जगणाऱ्या व्यक्तींचे अनुभव वाचल्याने सहानुभूती विकसित होऊ शकते. साहित्य मानवी भावनांचे सूक्ष्म पैलू उलगडते आणि दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव करून देते. संघर्षातून मार्ग काढणाऱ्या व्यक्तींची चरित्रे वाचल्याने प्रतिकूल परिस्थितीत धैर्य टिकविण्याची प्रेरणा मिळू शकते. आवडीचे पुस्तक वाचणे दैनंदिन धावपळीपासून काही काळ दूर जाण्याची संधी देते आणि चिंतनासाठी अवकाश उपलब्ध करून देते. वाचनामुळे प्रत्येक मानसिक अडचण दूर होते, असा दावा करता येणार नाही; परंतु ते व्यक्तीला अनुभव समजून घेण्यास, भावनांकडे विचारपूर्वक पाहण्यास आणि स्वतःच्या जाणिवांचा विस्तार करण्यास मदत करू शकते. म्हणूनच वाचन हे केवळ बौद्धिक विकासाचे साधन नसून व्यक्तीच्या भावविश्वाला समृद्ध करणारे माध्यमही आहे.आजच्या तरुण पिढीसमोर शिक्षण, रोजगार, कौशल्यविकास आणि स्पर्धेची अनेक आव्हाने आहेत. बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्यासाठी सतत नवे ज्ञान आत्मसात करावे लागते. केवळ पदवी किंवा प्रमाणपत्र मिळविणे पुरेसे नसून संवादकौशल्य, विश्लेषणक्षमता, समस्या सोडविण्याची वृत्ती आणि स्वतंत्र निर्णयक्षमता विकसित करणे आवश्यक आहे. नियमित वाचन या क्षमतांच्या विकासाला हातभार लावते. चरित्रे आणि आत्मचरित्रे संघर्षातून यश मिळविणाऱ्या व्यक्तींचे अनुभव सांगतात. विज्ञानविषयक साहित्य नवीन शोधांची ओळख करून देते. अर्थव्यवस्था, राज्यव्यवस्था आणि सामाजिक प्रश्नांवरील पुस्तके सार्वजनिक जीवनाचे आकलन वाढवतात. साहित्य आणि इतिहास यांचे वाचन सांस्कृतिक जाणीव समृद्ध करते. त्यामुळे तरुणांनी केवळ परीक्षाभिमुख साहित्यावर अवलंबून न राहता विविध विषयांतील पुस्तके वाचावीत. वाचनातून मिळणारे ज्ञान रोजगारासाठी उपयुक्त ठरण्याबरोबरच जबाबदार नागरिकत्वाची जाणीवही निर्माण करते. यशाची संकल्पना केवळ आर्थिक प्रगतीपुरती मर्यादित न ठेवता सामाजिक बांधिलकी आणि मानवी मूल्यांशी जोडण्यासही वाचन मदत करते.ग्रामीण आणि आदिवासी भागांमध्ये वाचनसंस्कृतीचा विस्तार करण्यासाठी विशेष प्रयत्न आवश्यक आहेत. अनेक ठिकाणी दर्जेदार पुस्तकांची उपलब्धता, सुसज्ज ग्रंथालये, इंटरनेट सुविधा आणि अभ्यासासाठी अनुकूल जागा यांची कमतरता जाणवते. त्यामुळे वाचनाची संधी सर्वांना समान प्रमाणात मिळत नाही. ग्रामपंचायती, शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक समुदाय यांच्या सहकार्याने गावोगावी वाचनालये सक्षम करता येतील. फिरती वाचनालये, सामूहिक पुस्तकसंच, वाचनकट्टे, कथाकथनाचे कार्यक्रम आणि स्थानिक लेखकांशी संवाद यांसारखे उपक्रम राबविता येतात. आदिवासी समाजातील लोककथा, लोकगीते, मौखिक इतिहास आणि पारंपरिक ज्ञान यांचे संकलन करून त्यांचे लेखी स्वरूपात जतन करणेही आवश्यक आहे. स्थानिक भाषांमध्ये साहित्य उपलब्ध झाल्यास अधिकाधिक लोक वाचनाकडे आकर्षित होऊ शकतात. वाचनालये ही केवळ पुस्तके ठेवण्याची ठिकाणे न राहता ज्ञानाची देवाणघेवाण, सामुदायिक चर्चा आणि शैक्षणिक विकासाची केंद्रे बनली पाहिजेत. ज्ञानाची उपलब्धता ही आर्थिक परिस्थिती किंवा भौगोलिक स्थानावर अवलंबून राहू नये, हा वाचनसंस्कृतीच्या विस्तारामागील महत्त्वाचा सामाजिक दृष्टिकोन असला पाहिजे.डिजिटल युगामुळे वाचनाचे स्वरूप बदलले आहे. भ्रमणध्वनी, संगणक, वाचकयंत्रे, ध्वनीपुस्तके आणि डिजिटल ग्रंथालये यांमुळे साहित्य मिळविणे अधिक सुलभ झाले आहे. एका छोट्या उपकरणात हजारो पुस्तके साठविता येतात आणि दूरवर असतानाही ज्ञानस्रोतांचा वापर करता येतो. दृष्टीदोष असलेल्या व्यक्तींसाठी ध्वनीपुस्तके, तसेच वाचनात अडचणी असणाऱ्यांसाठी मोठ्या अक्षरांतील साहित्य उपयुक्त ठरते. त्यामुळे डिजिटल माध्यमांनी वाचनाच्या संधी विस्तारल्या आहेत. तथापि, समाजमाध्यमांवरील सतत बदलणारी माहिती, लहान संदेश आणि ध्वनिचित्रफितींच्या गर्दीत सखोल वाचनासाठी आवश्यक असलेली एकाग्रता कमी होण्याची शक्यता आहे. माहिती सहज उपलब्ध होणे आणि तिचे योग्य आकलन होणे या वेगळ्या गोष्टी आहेत. इंटरनेटवर प्रसारित होणारी प्रत्येक माहिती विश्वासार्ह असेलच असे नाही. म्हणून स्रोत तपासणे, विविध संदर्भांची तुलना करणे आणि पुराव्यांच्या आधारे निष्कर्ष काढणे आवश्यक आहे. मुद्रित पुस्तके आणि डिजिटल साहित्य यांपैकी एकाची निवड करण्याऐवजी दोन्ही माध्यमांचा विवेकपूर्ण वापर करणे अधिक उपयुक्त ठरेल.कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या वापरामुळे ज्ञानप्राप्तीच्या नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. विविध विषयांची प्राथमिक माहिती मिळविणे, कठीण संकल्पना समजून घेणे आणि अभ्यासासाठी दिशा शोधणे यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित साधने उपयोगी ठरू शकतात. मात्र, या साधनांनी दिलेल्या उत्तरांवर पूर्ण अवलंबून राहणे योग्य नाही. तयार सारांश वाचणे आणि मूळ पुस्तकाचा सखोल अभ्यास करणे यांत फरक आहे. पुस्तक वाचताना लेखकाच्या विचारांची क्रमवार मांडणी, युक्तिवादातील बारकावे, पुरावे आणि निष्कर्ष समजून घेण्याची संधी मिळते. म्हणून तंत्रज्ञानाचा वापर वाचनाला पर्याय म्हणून नव्हे, तर त्याला पूरक म्हणून केला पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्तेने दिलेली माहिती मूळ संदर्भांमधून तपासणे, संदर्भग्रंथांचा अभ्यास करणे आणि स्वतःच्या शब्दांत विचार मांडणे ही कौशल्ये विकसित करणे गरजेचे आहे. तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले, तरी त्याचा जबाबदार वापर करण्यासाठी वाचनातून विकसित झालेली विवेकबुद्धी आणि चिकित्सक दृष्टी आवश्यक राहणार आहे.वाचनाची सवय निर्माण करण्यासाठी मोठ्या संकल्पांपेक्षा लहान आणि नियमित कृती अधिक परिणामकारक ठरतात. दररोज ठरावीक वेळ वाचनासाठी राखून ठेवणे, आवडीच्या विषयाचे पुस्तक निवडणे, वाचलेल्या मजकुरातील महत्त्वाचे विचार नोंदविणे आणि महिन्याला किमान एक पुस्तक वाचण्याचे उद्दिष्ट ठेवणे अशा साध्या उपायांनी सुरुवात करता येते. सुरुवातीला कमी पाने वाचली, तरी नियमितपणा महत्त्वाचा आहे. वाचलेल्या पुस्तकाबद्दल मित्रांशी चर्चा करणे, पुस्तक परीक्षण लिहिणे आणि वाचनगटात सहभागी होणे यांमुळे वाचनाचा अनुभव अधिक समृद्ध होतो. वाचनाची गुणवत्ता केवळ वाचलेल्या पुस्तकांच्या संख्येवरून ठरत नाही. त्या वाचनातून काय समजले, कोणते नवे प्रश्न निर्माण झाले आणि आपल्या विचारांत कोणते बदल घडले, हे अधिक महत्त्वाचे आहे. प्रत्येक व्यक्तीची आवड वेगळी असते. त्यामुळे एखाद्याला साहित्य, दुसऱ्याला विज्ञान, तर तिसऱ्याला इतिहास किंवा चरित्रे आवडू शकतात. महत्त्वाचे म्हणजे आपल्या आवडीच्या विषयापासून सुरुवात करून हळूहळू इतर विषयांकडेही वळणे. वाचन हा स्पर्धेचा विषय नसून आयुष्यभर सुरू राहणारा आत्मविकासाचा प्रवास आहे.१५ ऑक्टोबरचा वाचन प्रेरणा दिन साजरा करताना शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, ग्रंथालये आणि सामाजिक संस्थांनी वर्षभर वाचनविषयक उपक्रम राबविण्याचा संकल्प करावा. प्रत्येक शाळेत नियमित वाचनाचा तास, प्रत्येक महाविद्यालयात सक्रिय वाचनमंडळ आणि प्रत्येक गावात सुलभ सार्वजनिक वाचनव्यवस्था निर्माण झाली, तर वाचनसंस्कृतीचा विस्तार होऊ शकतो. पुस्तकदान, ग्रंथालयांना साहित्य भेट, गरजू विद्यार्थ्यांना संदर्भग्रंथांची मदत, लेखक-वाचक संवाद आणि वाचनाधारित चर्चासत्रे यांमधून ज्ञानाची देवाणघेवाण वाढविता येते. वृद्ध व्यक्ती आणि दिव्यांग वाचकांसाठी सुलभ वाचनसाहित्य उपलब्ध करून देणेही तितकेच आवश्यक आहे. वाचनाची संधी प्रत्येकापर्यंत पोहोचविणे ही केवळ शैक्षणिक बाब नसून सामाजिक समतेशी संबंधित जबाबदारी आहे. ज्ञानाचे दरवाजे सर्वांसाठी खुले झाले, तर समाजातील व्यक्तींना स्वतःच्या क्षमता विकसित करण्याची आणि सार्वजनिक जीवनात अधिक प्रभावीपणे सहभागी होण्याची संधी मिळेल.डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी ज्ञानाधिष्ठित, विकसित आणि आत्मविश्वासपूर्ण भारताचे स्वप्न पाहिले. हे स्वप्न साकार करण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशीलता, नैतिकता, सामाजिक बांधिलकी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण यांची सांगड घालणे आवश्यक आहे. या सर्वांचा पाया वाचनातून विकसित होणारी ज्ञानाची ओढ आणि स्वतंत्र विचार करण्याची क्षमता हा आहे. वाचणारा माणूस केवळ स्वतःचे जग समृद्ध करीत नाही, तर इतरांच्या अनुभवांशी जोडला जातो, सामाजिक प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहतो आणि अधिक समजूतदार निर्णय घेण्यास सक्षम होतो. वाचनामुळे प्रत्येक प्रश्नाचे उत्तर त्वरित मिळेलच असे नाही; मात्र योग्य प्रश्न विचारण्याची आणि उत्तरांचा चिकित्सक शोध घेण्याची क्षमता नक्कीच विकसित होऊ शकते. म्हणूनच वाचन प्रेरणा दिन हा एका दिवसाचा उत्सव न राहता आयुष्यभर पुस्तकांशी मैत्री टिकविण्याचा संकल्प ठरला पाहिजे. कारण पुस्तकांचे वाचन म्हणजे केवळ पानांवरील शब्द समजून घेणे नव्हे, तर स्वतःला, समाजाला आणि जगाला अधिक व्यापकपणे जाणून घेण्याचा मार्ग आहे. वाचनातून विचार समृद्ध होतात, विचारांतून कृती घडते आणि विवेकी कृतीतून समताधिष्ठित, संवेदनशील व प्रगत समाजाची निर्मिती होते.

डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्र, पाली व बौद्ध साहित्याचे अभ्यासक आहेत) ईमेल — bagate.rajendra5@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १५ ऑक्टोबर २०२६

नवरात्रीचा मूळ गाभा आणि साधेपणा हरवत चालला

नवरात्री आणि आपली आजची मानसिकता या विषयाकडे पाहताना असे लक्षात येते की, काळानुसार मानवी स्वभाव, जीवनशैली आणि श्रध्दा ठेवण्याच्या पद्धती बदलल्या आहेत. आजच्या आधुनिक जगात नवरात्रीच्या नऊ दिवसांकडे आणि मानसिकतेकडे पाहण्याचे अनेक दृष्टिकोन समोर येतात. नवरात्री आणि आजची मानसिकता या दोन्ही गोष्टींचा परस्परसंबंध अत्यंत रंजक आणि विचार करायला लावणारा आहे. नवरात्र हा केवळ नऊ दिवस उपवास करण्याचा, गरबा खेळण्याचा किंवा धार्मिक विधींचा सण राहिलेला नाही, तर तो आजच्या मानवी मानसिकतेचे आणि बदलत्या सामाजिक दृष्टिकोनाचे प्रतिबिंब बनला आहे. पूर्वी नवरात्र हा प्रामुख्याने कडक उपवास, व्रतवैकल्ये, पूजा-अर्चा आणि अध्यात्माचा काळ मानला जायचा. आजच्या मानसिकतेत श्रध्दा कायम आहे, पण तिचे स्वरूप अधिक उत्सवप्रिय आणि सामाजिक झाले असून भक्तीपेक्षा दिखाव्याला अधिक महत्त्व आले आहे. गरबा, दांडिया, नऊ रंगाचे कपडे घालणे आणि सोशल मीडियावर फोटो शेअर करणे याभोवती तरुणाई अधिक फिरताना दिसते. भक्तीची जागा ब-याच अंशी मनोरंजनाचे आणि ताणतणाव विसरण्याच्या साधनाने घेतली आहे. गरबा आणि दांडिया हे आता मोठे व्यावसायिक इव्हेंट्स झाले आहेत. महागडे पासेस, डिझायनर कपडे यावर होणारा खर्च आजच्या दिसण्याच्या मानसिकतेवर प्रकाश टाकतो. आजच्या मानसिकतेची एक नकारात्मक बाजू म्हणजे या सणाचे झालेले प्रचंड व्यापारीकरण. नऊ दिवसांचे पासेस, महागडे कपडे, इव्हेंट्स आणि स्पॉन्सर्स यांच्या गर्दीत सणाचा मूळ गाभा आणि साधेपणा काहीसा हरवत चालला आहे. गरब्यासाठी महागडे पासेस, डिझायनर कपडे यामुळे या सणाचे स्वरूप थोडे व्यावसायिक झाले आहे. यामुळे कधीकधी मूळ आध्यात्मिक भाव मागे पडतो की काय, अशी शंका येते. अनेकांसाठी हा सण आध्यात्मिक अनुभूतीपेक्षा 'स्टेटस सिम्बॉल' किंवा दिखाव्याचे माध्यम बनत चालला आहे. आजचे जीवन अत्यंत धावपळीचे आणि तणावाचे झाले आहे. अशा वेळी नवरात्रीचे नऊ दिवस अनेक लोकांसाठी मानसिक शांतता आणि डिटॉक्स करण्याचा काळ बनला आहेत. पूर्वी उपवास हा केवळ धार्मिक भाग होता, आज लोक याकडे आरोग्य आणि शरीराला विश्रांती देण्याच्या मानसिकतेतूनही पाहतात. दैनंदिन तणावातून काही काळ बाजूला होऊन मन सकारात्मक ऊर्जेने भरण्यासाठी लोक या दिवसांत देवीची उपासना करतात. नऊ दिवस केली जाणारी प्रार्थना किंवा ध्यान लोकांना मानसिक शांतता आणि सकारात्मक ऊर्जा देणारे साधन वाटते. आजच्या 'डिजिटल' युगात माणूस स्क्रीनला खिळलेला असतो. नवरात्रीचे नऊ दिवस लोकांना घराबाहेर पडून, मित्रांना भेटण्याची आणि गरब्याच्या निमित्ताने एकत्र येण्याची संधी देतात. त्यामुळे गरबा आणि दांडिया हे केवळ नृत्य राहिले नसून, ते आजच्या पिढीसाठी ताणतणाव विसरून मुक्तपणे जगण्याचे आणि आनंद साजरा करण्याचे माध्यम बनले आहे. तसेच हा सण आता केवळ घरात पूजेपुरता मर्यादित न राहता, एकत्र येऊन आनंद साजरा करण्याचा एक मोठा सामाजिक सोहळा बनला आहे. काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर या षडरिपूंवर विजय मिळवणे हा या सणाचा खरा उद्देश आहे. नवरात्र म्हणजे आदिशक्तीच्या, स्त्री शक्तीच्या जागरणाचा उत्सव. आजचा सुशिक्षित समाज या नऊ दिवसांत स्त्री सबलीकरण, स्त्री शिक्षण आणि त्यांच्या हक्कांबद्दल उघडपणे बोलू लागला आहे. स्त्रीला केवळ 'अबला' न मानता तिचे 'दुर्गा' रूप स्वीकारण्यास तयार होत आहे म्हणजेच आजची मानसिकता या संकल्पनेला अधिक प्रगल्भतेने पाहू लागली आहे. एकीकडे समाजात कर्तृत्ववान स्त्रियांचा आदर करणे, त्यांना समान संधी देणे याविषयीची जाणीव वाढली आहे म्हणजेच सकारात्मक बदल दिसून येत आहे. तर दुसरीकडे द्वंद्व ही पहायला मिळत आहे. नऊ दिवस देवीची मनोभावे पूजा करतो. पण समाजात ख-या आयुष्यातील स्त्रियांवर होणारे अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार किंवा त्यांच्याशी होणारा दुजाभाव थांबवायचा नाही म्हणजेच दुर्लक्ष करायचे. नवरात्रीत आपण दुर्गेच्या नऊ रूपांची पूजा करतो. लहान मुलींना देवी मानून त्यांचे पादपूजन करून पाय पडतो. पण दुसरीकडे, समाजात महिलांविरुध्दचे गुन्हे आणि मानसिक छळ कमी झालेला नाही. नऊ दिवस ज्या स्त्री शक्तीला आपण पूजतो, त्याच स्त्रीचा रोजच्या आयुष्यात किती आदर केला जातो म्हणजे महिलांची सुरक्षितता आणि आदर हा आजच्या मानसिकतेसमोरील मोठा प्रश्न आहे. आधुनिक महिला आता या सणाकडे स्वत:मधील 'दुर्गा' (आत्मविश्वास आणि शक्ती) जागृत करण्याचे माध्यम म्हणून पाहत आहे. आजची स्त्री अन्यायाविरुध्द आवाज उठवण्यासाठी नवरात्रीच्या ऊर्जेचा वापर करत आहे. आजच्या न्यूक्लियर फॅमिली आणि डिजिटल जगात माणूस एकटा पडत चालला आहे. नवरात्रीचे नऊ दिवस लोकांना एकत्र आणतात, ज्यामुळे 'एकटेपणाची मानसिकता' दूर होऊन समाजात सुरक्षिततेची भावना निर्माण होते आणि मानसिक प्रवासाला एक नवी ऊर्जा मिळते. सर्व मतभेद, जात-पात बाजूला ठेवून एकत्र नाचणे, आनंद साजरा करणे यामुळे समाजातील एकतेची भावना बळकट होते. वर्षभराच्या थकव्यानंतर मानवी मनाला पुन्हा नवसंजीवनी देणारा हा काळ ठरतो. नवरात्रीच्या नऊ रंगाचे आजच्या काळात वेगळेच वेड आहे. कार्यालयांमध्ये, कॉलेजमध्ये सर्वजण एकाच रंगाचे कपडे घालताना दिसन येते. ही मानसिकता 'एकता' आणि 'समानता' दर्शवते. विषमतेच्या भिंती तोडून सर्वांनी एकत्र येण्याची ही आधुनिक मानसिकता नक्कीच कौतुकास्पद आहे. सांगायचे तात्पर्य म्हणजे आजची मानसिकता नवरात्रीकडे एक पारंपरिक धार्मिक सण म्हणून तर पाहतेच, पण सोबतीला मनोरंजन, सामाजिक एकत्रिकरण आणि मानसिक ऊर्जा मिळवण्याचे एक उत्तम माध्यम म्हणूनही याकडे बघते. नवरात्री हा केवळ एक धार्मिक सण राहिलेला नाही, तर तो सामाजिक एकत्रिकरण, आत्मपरीक्षण आणि मनोरंजनाचा एक मोठा उत्सव बनला आहे. गरज आहे ती फक्त बाह्य भपक्यापलीकडे जाऊन या सणामागील 'स्त्री शक्तीचा आदर' आणि 'अंतर्मनाच्या शुद्धीकरणाचा' विचार जपण्याची आणि देवीच्या रूपांमधील संयम, बुध्दी आणि करुणा हे गुण आपल्या दैनंदिन विचारांमध्ये आणि वर्तनात उतरवण्याची. जेणेकरून ख-या अर्थाने आपल्या मनातील 'महिषासूर' रुपी नकारात्मक विचारांचा मर्दन करता येईल. आधुनिक काळात लोकांच्या मानसिकतेत एक सकारात्मक बदलही पाहायला मिळत आहे, तो म्हणजे पर्यावरणपूरक नवरात्र. प्लास्टर ऑफ पॅरिस ऐवजी शाडूच्या मातीच्या मूर्तीची स्थापना करणे, रासायनिक रंगाऐवजी नैसर्गिक रंगाचा वापर करणे आणि ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी आवाजाची मर्यादा पाळणे याविषयी आजची तरुण पिढी जागरूक होत आहे. हा बदल समाजाच्या प्रगतीशील मानसिकतेचे लक्षण आहे. अनेक मंडळांमध्ये आता महागड्या मूर्ती किंवा सजावटीऐवजी त्या पैशातून रक्तदान शिबिरे, गरजू विद्यार्थ्यांना मदत किंवा वृक्षारोपण यासारखे सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. म्हणजेच आजची तरुण पिढी अधिक संवेदनशील होताना दिसते. लोक परंपरेचा आदर करत आहेत, पण त्यात स्वत:च्या सोयीनुसार आणि आधुनिक विचारसरणीनुसार बदलही करत आहेत. भारतीय संस्कृतीत नारीला आदिशक्तीचे रूप मानले गेले आहे. त्यामुळे नवरात्र हा भारतीय संस्कृतील अत्यंत महत्त्वाचा, ऊर्जेचा आणि आदिशक्तीच्या उपासनेचा सण आहे. नऊ दिवस चालणा-या या उत्सवात आपण दुर्गेच्या नऊ रूपांची अत्यंत भक्तीभावाने पूजा करतो, उपवास करतो आणि तिचा जयजयकार करतो. हा सण केवळ धार्मिक विधींपुरता मर्यादित नसून तो वाईटावर चांगल्याचा विजय आणि स्त्री शक्तीचा सन्मान करण्याचे प्रतिक आहे. पण नवरात्र संपताच, 'या देवी सर्वभूतेषु शक्तिरूपेण संस्थिता' म्हणणारे आपण, आपल्याच घरातील आणि समाजातील जिवंत स्त्रीशक्तीचा आदर करायला का विसरतो? आपण पुन्हा आपल्या जुन्या मानसिकतेकडे का वळतो? म्हणून स्त्रीशक्तीचा आदर केवळ नवरात्री पुरताच का? हा आजच्या काळातील आधुनिक समाजासमोरील एक अत्यंत गंभीर आणि विचार करायला लावणारा प्रश्न आहे. एकीकडे आपण स्त्रीला देवीचे रूप मानून तिच्यासमोर नतमस्तक होतो, तर दुसरीकडे प्रत्यक्ष आयुष्यात अनेक स्त्रियांना दुय्यम वागणूक दिली जाते. वर्षातील नऊ दिवस तिची पूजा करणे आणि उर्वरित ३५६ दिवस तिच्या अस्तित्वाचा, तिच्या हक्कांचा आणि तिच्या भावनांचा आदर न करणे, हा एक ढोंगीपणा आहे. ख-या स्त्रीशक्तीचा आदर करायचा असेल, तर तो केवळ काही दिवसांपुरता मर्यादित न राहता दैनंदिन जीवनाचा भाग असायला हवा. आजच्या आधुनिक युगातही आपल्याला अनेक विरोधाभास पाहायला मिळतात. नवरात्रीत रात्री उशिरापर्यंत गरबा खेळणा-या मुलींना सुरक्षित वातावरण मिळते, पण एरवी मात्र त्यांना रात्री बाहेर पडताना हजार वेळा विचार करावा लागतो. एका बाजूला 'कन्या पूजन' केले जाते, तर दुस-या बाजूला आजही समाजात मुलगा आणि मुलगी असा भेद केला जातो. घरात आणि कामाच्या ठिकाणी रात्रंदिवस झटणा-या स्त्रीच्या कष्टाला अनेकदा गृहीत धरले जाते. स्त्रीशक्तीचा खरा आदर केवळ मूर्तीची पूजा करण्यात किंवा तिची स्तुती गाण्यात नाही. शिक्षण, नोकरी आणि प्रगतीचे निर्णय घेताना तिला पुरुषांच्या बरोबरीने समान संधी आणि स्वातंत्र्य मिळणे आवश्यक आहे. प्रत्येक स्त्रीला घरात, रस्त्यावर आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षित आणि सन्मानाचे नि रात्रीच्या वेळीही भीतीमुक्त वातावरण मिळायला हवे. तिच्या मताला, तिच्या आवडीनिवडीला महत्त्व आणि तिच्या स्वप्नांवर बंधने न घालता तिला स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्याचे स्वातंत्र्य समाजात दिले पाहिजे. मुलांवर लहानपणापासूनच मुलींचा आदर करण्याचे संस्कार झाले पाहिजे. जोपर्यंत आपण घरातल्या स्त्रीला माणूस म्हणून आदर देत नाही, तोपर्यंत मंदिरातील देवीची पूजा व्यर्थ आहे. स्त्री ही केवळ चूल आणि मूल सांभाळणारी व्यक्ती नसून ती आज अंतराळापासून ते देशाच्या संरक्षणापर्यंत प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व गाजवत आहे. तिच्यातील या अथांग शक्तीचा आदर रोजच्या व्यवहारात दिसणे गरजेचे आहे. काळ बदलतो तशा सण साजरा करण्याच्या पद्धती बदलतात हे स्वाभाविक आहे. आजच्या मानसिकतेत जरी आधुनिकता आणि मनोरंजन वाढले असले, तरी सणाचे मूळ मर्म विसरता कामा नये. नवरात्र ही केवळ नऊ दिवस नटण्याची किंवा गरबा खेळण्याची संधी नाही, तर ती स्वत:मधील नकारात्मक विचार, अहंकार आणि वाईट सवयींवर विजय मिळवण्याची पर्वणी आहे. स्त्री ही केवळ नवरात्रीत पुजली जाणारी मूर्ती नाही, तर ती सृष्टीचे चक्र चालवणारी, कुटुंबाला आधार देणारी आणि समाजाची प्रगती साधणारी जिवंत शक्ती आहे. जोपर्यंत आपण आपल्या घरातील आई, बहीण, पत्नी आणि मुलगी यांच्या कर्तृत्वाचा आणि अस्तित्वाचा आदर करत नाही, तोपर्यंत नवरात्रीच्या पूजेला काहीच अर्थ उरणार नाही. म्हणूनच, स्त्रीशक्तीचा आदर हा केवळ नऊ दिवसांचा उत्सव न ठरता, तो ३६५ दिवसांचा जीवनमार्ग बनला पाहिजे. आपण समाजातल्या प्रत्येक स्त्रीला सुरक्षित आणि आदरयुक्त वातावरण देऊ, तरच ख-या अर्थाने देशात आणि समाजात 'नवरात्र' साजरी होईल.

सुनील शिरपुरे
कमळवेल्ली,यवतमाळ भ्रमणध्वनी
७४९८८८५०६१

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १५ ऑक्टोबर २०२६

मी दिवा विझवला नाही - माणुसकीचा निस्सीम ध्यास गझल



शब्दस्नेही गिरीश जोशी (गझलगिरीश)या मित्राने तन्मयतेने मला त्याचा गझलसंग्रह दिला झपाटल्यागत वाचला यातला प्रत्येक शेर,मतला पहिली ओळ आमद तिची लय,यती,आशय प्रपंच आवडून गेला इतकं नितळ निर्लेप निस्पृह श्रद्धेय भावनेतून ही काव्यभक्ती गझलगिरीश यांची होऊन आली आहे.गझलेची तंत्रसाधना अवगत होणे इतके चं नाही तर इथं अंतरंगी सृजनशीलता व मनाचे भावतरंग अलगद काट्याच्या आनीवर फुलपाखरू होऊन बसावं इतकी नजाकत गझलेत आहे."चेहरा माझा तमाने झाकला नाही कधी मी प्रकाशाच्या पिढीचा वारसा सांभाळतो."खरंच ही गझल साधना म्हणजे भावमनाचं सच्चेपणं आहे.कारण विद्यार्थी ज्ञानार्जीत करणे.हा वसा आणि वारसा अंतरंगी आहे.ही ज्ञान साधनेची सार्थक्ता आहे.विद्यार्थी दैवत अन् त्यांच्या प्रतिची मनस्वी असक्ती.'वर्ग हाच स्वर्ग' मानणारा अध्यापक प्रकाशाच्या पिढीचा वारसा सांभाळणारे गिरीश जोशी जी.गझल ही जरी प्रेमाचे सजल रूप धारण करते पण तिचा अटकर बांधा ही देखणा असावा लागतो.तशी ही गझल सर्वव्यापी आहे.मग ती 'सुंगधी कहर,मोगऱ्याची कदर,साजणीची खबर, म्हणून सविनय गझलेची धारणा अशी,"ना सूर्य कुणाचा झालो,ना पणती होऊ शकलो पण कुठल्याही घरट्याचा,मी दिवा विझवला नाही"ही अनंत नितळ निर्लेप निस्पृह श्रद्धेची निस्सीम प्रेम भक्तीची परिपूर्णता आहे.हे मनाचं अथांगपण सांगून जातं.या गझलेची व्यापक्ता ही सविनय भावानेचा व आत्ममग्नतेचा परिपोष आहे.खरतर या गझलेचा अंतर माणुसकी हाच ध्यास आहे.मानवी वृत्ती प्रियवृती स्नेहाळू भाव मनाला व्याकुळ करुन जातो.इतकं अतोनात नातं या गझलेचं माणुसकीशी आहे.माणुसकी म्हणजे आत्मिक अंतःकरणीय मायाळूपास हाच ध्यास.जसे "राखेमधली धग बाकी,थांबलास का जग बाकी.खुशाल होवो जग वैरी,ठेव एक जिवलग बाकी."ही जगण्याची सकारात्मक विचारधारेची पेरणी आणि पराकोटीचा आशावाद या गझलेने दिला आहे.गझलगिरीश यांना चांगल्या सुसंगतीची ओढ आहे."नेहमी गाईन मी नांदी तुझी मन तुझे सोने नजर चांदी तुझी.ह्याच वाक्याने तुझ्या निर्धास्तलो जन्मभर होईन फांदी तुझी"हे निस्सीम स्नेहाळू माणूसकीच्या भक्तीचं प्रतिक.ओंजळभर गझलेंची फुले अर्पण करत आपल्या सन्मित्र भावनेचा ओलावा कायमचं टिकला पाहिजे.कारण मनाची मशागत ही गझल करते.इतकं हळवा गहिवर यातून येतो.गझल हा काव्यप्रकार अत्यंत तेजस्वी साधनेचा मतला,शेर ही तिची खरी संपत्ती आहे.मनाच्या तरलं भावबंध तर आहेच मन तितकीच दर्द कैफियत आहे.जसे"वेदनेच्या लक्तरांची सोडते झोळी गझल खिन्न झालेल्या मनाला सुचविते ओळी गझल"हे मनस्वी संयत मनोभूमिकेतून अस्सल गझलेची ठेवणं आहे.ख्यातनाम जेष्ठ गझलकार प्रमोद खराडे प्रस्तावनेत "जरी आटलो असेन आता,कधी कुणाचा सागर होतो."दोन ओळींमध्ये एका शेरात कमाल आशय व्यक्त करता येणं, अर्थात गागरमे सागर भरना हेच चांगल्या शेराचं आणि त्यामुळेच गझल लोकप्रिय असण्याचेही कारण आहे.अर्थात त्यासाठी तो गझलकार वकुब असणारा हवा.गिरीश जोशी यांनी चांगली सिद्धी मिळवली आहे.हे ध्यानात येतं "(प्रस्तावना)गझलेत आशयाचा प्राण फुंकणं खऱ्या गझलकारचा आत्मा आहे तो साधनेतून व हळूवार सृजनशीलतेतून कायमचं ठेवावा लागतो तो उतरत जाते गझल काळजात तिचा मतला होतो आविष्कार तर शेर मनाचा तळडोह ढवळून काढतो."जगाला जरी मी जुना होत गेलो तिला भेटल्याने नवा होता आहे.तिला सूर्य होऊन शोधू न शकलो तिला शोधण्या काजवा होत आहे"(पृ.२०) ही या गझलेचीनजाकत आहे.या अस्वस्थ जगण्याच्या कोलाहल व मनाचे दिव्यत्व असे की या स्मशानासही स्वर्ग बनवता येते.पण शेजारी प्रेयसीची कबर पाहिजे.आज या भंयकराच्या दारात वेदना घेऊन जगणारे माणसं पाहून मन व्यथीत होते तेव्हा हे भलतेच रोग आम्ही लावून घेतले.तर या आजच्या वर्तमानाची वास्तव भंयकर आहे.कागदोपत्री स्त्री -सबलीकरण झाले आहे."कागदोपत्रीच स्त्री-सबलीकरण होते मुख्य चौकातून मुलगी घाबरत जाते..भरवशाचा पोस्टमन असते नजर अपुली या मनाचे त्या मनाला पोचवत जाते"(पृ.३३)हे अतिशय विदारक सत्य या गझलेने मांडले आहे.कारण माणुसकीहाच कवीचा ध्यास आहे.मातृत्व, पितृत्व,सखा,सखी,नाते या मंतरलेल्या मायाळू स्नेहाळू भावनेचा ओलावा ही गझल देऊन जाते इतकं नितळ श्रेध्दय निर्लेप निस्पृह प्रेम या गझलेत आहे.इथल्या माणसाच्या वृत्ती-विकृतीवरचे भाष्य अतिशय मनापासून आहे.तू तुझ्यातला रावण मार या षड्रिपुचा रावण मार,म्हणून "षड् रिपूंच्या रावणाला रोज आता जाळ तू रावणाला जाळण्या दसरा कशाला पाहिजे?"(पृ.४३) यामानवी मनाच्या झगमगाटाला शब्द अंजन घालणारी ही गझल असल्याने"बंद ओठांचे कुलूप उघडायला/फक्त ओठांचीच चावी लागते/ऐरणीचा प्रश्न मार्गी लागतो/एकदा बस वेळ यावी लागते" (पृ.४५) या माध्यमातून सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक भरणं पोषण या गझलेच्या दृष्टीने समर्पक समृद्ध सकारात्मक विचारधारेची पेरणी करणारी ही गझल आहे.सांजवेळी स्मृतीची पाखरं मनाच्या फांदीवर बसतात.सूर्य अस्ताला गेला की हा भोवताल कृष्ण होतो.मनाची ओलं मोजणे,या मनस्वी चिंतन मंथन मर्मबंध सांगणारी गझल खरंच किती हळवी असते."माय शिवतांना किती गोंजारते!शर्ट म्हणतो चारदा उसव मला...मी मराया लागता इतके करा चार गझला ऐकवा जगवा मला..सत्य होऊन उगवणारा सूर्य मी स्पर्शही नाही करत अफवा मला "(पृ.५२) ही प्रचंड मनाची तरलं अद्यम्य इच्छा ही कविता मनमस्तिष्कांच्या खोल डोहातलं अत्तर आहे.तर लेखक वक्ते सन्मित्र शरद तांदळेअतिशय मौलिक संदेश देतात "गिरिशजीच्या गझलेत प्रेम, माणुसकी, आपलेपणा, स्वाभिमान, नात्यांमधील विश्वास इत्यादी भावबंधाचा मिलाफ पहायला मिळतो.त्यांच्या रचनामधील सौंदर्यदृष्टी, प्रतिमासृष्टी,खयालाचे वेगळेपण,विशिष्ट शैली आणि गझलेतील नाविन्य मला फार भावले त्यामुळेच गिरीश जोशी यांचा संग्रह निघाला"(शुभेच्छा संदेश)हे अतिशय चिंतन आशय संपन्न भाष्य आहे.पणकुठल्याही घरट्याचा 'मी दिवा विझवला नाही'.हे मनस्वी मनाचं हळवेपण आणि हा गझलेचा माणुसकीचा मळवट ललाटी घेऊन आलेला सिद्धहस्त गझलकार.गझल धन्वंतरी होणे,गझल कांदबरी होणे,चांगूलपणाची ओढ हीसत्संगतीची आहे.या गझलेत विचार आचार व संस्कृती संस्काराची शिदोरी घेऊन आलेली ही गझल आहे.मनातअति नितळपण जेव्हा गझलेतून निर्झर होतं तेंव्हा द्वेषाची दुनिया बदलते एवढा अद्यम्य विश्वास या गझलेने दिला आहे.जसे"सोसलेल्या वंचनाचे सारं गझला सोबती आहेत माझ्या चार गझला.कोणत्या मापात मोजावे कळेना भावनेच्या सागरी विस्तार गझला."गझलनवाज भीमराव पांचाळे 'व्वा! क्या कहने है गिरीश!!.ही मनस्वी स्नेहांकित हृदयाची शाबासकीची थाप या गझलेने मिळवली आहे.या मंतरलेल्या गझला ख्यातनाम गायक/गायकांनी गायल्या आहेत.हे श्रेयस या गझलेचं आहे.एक माणसा विषयचा माणूसकीचा गहिवर पहा."जनतेपेक्षा नेता कोणी मोठा नसतो राजा अपुला सेवक असतो राजा नसतो.या सृष्टीवर प्रेमच केवळ शाश्वत असते प्रेमाइतका अतूट कुठला धागा नसतो"(पृ.७४) चिंतनाचे खत दिल्यावर दानेदार गझला झाल्या, पाण्यावर तरते तेंव्हा तुकोबांची गाथा कळते,या संस्कारांची खरी ओंजळ आजी असते.तमाने चेहरा झाकला नाही प्रकाशाच्या पिढीचा वारसा सांभाळने ही सविनय भावना अतिशय मौलिक विचार अधिष्ठान प्राप्त करणारी आहे.पुस्तके वाचून खरे खोटे चेहरे माणसाचे वाचता येते."जो आपुला म्हणावा पाठीत वार करतो प्याला हलाहलाचा भरवून जात आहे पैसाच राक्षसी अन् वैरी कसा निघाला पाश्र चात्य संस्कृतीला रुजवून जात आहे"(पृ.११९)ही गझल समकालीन वास्तवाचे सम्यक भान देऊन जाते.गझलेचे अंतरंग हे स्वर साधनेचा ही आत्मा आहे.शेरमतला व आमद व यतीच्या रोह-अवरोह शलाका मांडणे ही मनस्वी मैफल होते.एवढे अनभिषिक्त गझल गिरीश जोशी यांची आहे.या गझलसंग्रहांचे मुखपृष्ठ कवी कलावंत आपल्या सृजनशील भूमिकेचा नायक असतो.तो या मानवाच्या अस्वस्थ वेदनीची गझल होऊन जगतो आहे.अतिशय आशय संपन्न सृजन समर्पक विचार चिंतनाचेमुखपृष्ठ संतोष धोंगडे यांचे आहे.न्यु.ईरा पब्लिकेशनचे संतोष तांदळे यांची निर्मिती अतिशय देखणी झाली आहे.कवी गझलगिरीश यांना अनंत शुभेच्छा.

पुस्तक:-'मी दिवा विझवला नाही' (गझलसंग्रह)गझलकार:-गिरीश जोशी (गझलगिरीश)प्रकाशक:-संतोष तांदळे न्यू ईरा पब्लिकेशन हाऊस,पुणे प्रथमवृती:-३१ मे २०२६मुखपृष्ठ:-संतोष धोंगडे पृष्ठ संख्या:-१२०/किंमत:-२५०रूपयेपुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालना

प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002